अचूक अंदाजपत्रके
बनविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
परिपत्रक क्रमांक :-बीडीजी २००५ /प्र.क्र ८२/इमारती-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५/८/२००५.

वाचा:- शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक बीडीजी १०९४/ प्र.क्र. १०८ इमारती-१ दिनांक १६/७/१९९४

**प्रस्तावना** - कामांची अंदाजपत्रके अचूक न बनविल्याने, खर्चात वाढ होण्याची प्रकरणे वाढत असून, सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव शासनास प्राप्त होत आहेत. अपवादात्मक बाबींची प्रकरणे वगळून सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव कमी करण्याच्या दृष्टीने यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

**परिपत्रक** - कामांची अंदाजपत्रके बनविताना सर्व बाबींचा विचार करुन अचूक अंदाजपत्रके सादर करण्याबाबत उपरोक्त दिनांक १६/७/१९९४ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि, या सुचनांचे पालन न झाल्याने, खर्चात वाढ होण्याची प्रकरणे वाढत असून, सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास प्रस्ताव प्राप्त होत आहेत. सबब, अंदाजपत्रके तयार करताना उपभोक्ता खात्याच्या सुचनेनुसार केलेली व करावयाची कामे समाविष्ट करुन अचूक अंदाजपत्रके तयार करण्यात यावी. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर मूळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या बाबींचा कामांमध्ये/खर्चामध्ये समावेश करण्यात येऊ नये. उपभोक्ता खात्याच्या सुचनेनुसार मूळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसलेल्या बाबींचा कामांमध्ये समावेश करावयाचा झाल्यास, तसेच मान्यताप्राप्त आराखडे व नकाशामध्ये बदल सुचविण्यात आल्यास,परिणामी कामावर होणा-या जादा खर्चास स्वयंस्पष्ट समर्थनास सक्षम अधिकारी/विभाग यांची मान्यता घेण्यात यावी .सदर सुचनांचे कटाक्षाने पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( हिं. अ. श्रीमाळ )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सचिव (रस्ते), यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,
सचिव (बांधकामे), यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,
मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई,
सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
का. इमारती २, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
(निवड नस्ती)